


म. ग्रं. सं. ठाणे
विषय ८०.८०
वा. क्र. १६५८३६
IRBK-0116436
IRBK-0116436

# षड्रिपु कथा

कृ. पं. देशपांडे

षड्रिपु-कथा : पुष्प २ रे




लेखक

कृ. पं. देशपांडे

मूल्य : एक रुपया

IRBK-0116436

IRBK-0116436

१९७५

प्रकाशक :
न. शं. कुलकर्णी,
जयन्त आणि कंपनी,
स. नं. ७२० चा २०,
नवी पेठ, पुणें ३०.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति : दिनांक १५ ऑगस्ट : सन १९७५
शुक्रवार : श्रावण शुद्ध नवमी : शके १८९७

मुद्रक :
न. शं. कुलकर्णी,
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
स. नं. ७२० चा २०,
नवी पेठ, पुणें ३०.

७६४३६

# षड्रिपु-कथाएँ




# क्रोध-रिपू

क्रोध (राग) ही भावना उपजतच असते. क्रोध अनावर झाला म्हणजेच तो मन अशांत करतो.अशांत मन विचाराला सोडून विकाराला जवळ करतें. विकाराधीन मन अंधळं बनतं; अशा स्थितींत पुढं काय घडतं, तें ही कथा वाचा म्हणजेच कळेल.

— प्रकाशक

काम-क्रोध आड पडले पर्वत ।
राहिला अनंत पलीकडे ।।

— तुकाराम




दुर्वास ऋषींना पाहून अंबरीष राजाला समाधान वाटले. त्यांना वंदन करून तो म्हणाला, –

" मुनिवर्य, आज एकादशीच्या व्रताचं पारणं आहे. आपण माझे अतिथी आहात. भोजनाची सिद्धता आहे. भोजन करून माझ्या आतिथ्याचा स्वीकार करावा."

" तथास्तु."

दुर्वास ऋषींनी राजाला अनुमती दिली; आणि म्हणाले, –

" राजा, यमुनेवर जाऊन स्नान-संध्या आटोपून येतो. मग भोजनाला बसू."

" जशी आपली इच्छा."

दुर्वास निघून गेले.

राजा अंबरीष एकादशीचं व्रत नित्य नियमाने करीत असे. दशमीच्या दिवशी एक भुक्त रहायचं. एकादशीच्या दिवशी उपवास करायचा.

**उपवास म्हणजे जवळ बसणं. परमेश्वराच्या सान्निध्यात बसणं, त्याचं स्मरण करणं, भजनपूजन करणं हाच खरा उपवास !**

द्वादशीच्या दिवशी पाच घटका दिवस वरती आला की, कोणी अतिथी अभ्यागत आहे की नाही ते पाहून, राजा पारणे करीत असे.

" दुर्वासांसारखा, श्रेष्ठ योग्यतेचा ऋषी, आज अतिथी म्हणून लाभला होता. राजाला धन्यता वाटली. कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. तो त्यांची वाट पाहू लागला.

दिवस वरती येत होता. सूर्योदय होऊन चार घटका लोटल्या होत्या. दुर्वास मुनी अजून परतले नव्हते. जसजसा वेळ जाऊ लागला तसतसं राजाचं लक्ष त्यांच्या वाटेकडे लागलं. दुर्वास अजूनही आले नव्हते. राजाच्या मनात चलबिचल सुरू झाली. राजा अस्वस्थ झाला.

हे सारे राजपुरोहिताच्या लक्षात आले. त्यानं सांगितलं,–" महाराज, चरणी एक विनंती आहे."

" बोला –"

" महाराज, दिवस वर येऊन पाच घटका होत आल्या आहेत. नैवेद्य समर्पण करून पारणं केलं नाही तर व्रतभंग होईल."

" खरं आहे; पण गुरुजी, सांगितलेल्या अतिथीशिवाय भोजन कसं करायचं ? ते अनुचित होईल."

" भोजन करू नये; पण नैवेद्य समर्पण करावा आणि शालीग्रामाच्या शिळेचं तीर्थ घेऊन पारणं सोडावं."

राजानं पुरोहिताचं सांगणं मानलं. नैवेद्य समर्पण केला. तीर्थ घेतलं. राजा वाट पहात बसला. एवढ्यात दुर्वास दाण् दाण् पावले टाकीत तेथे आले. अंतर्ज्ञानाने त्यांना सारा प्रकार समजला होता. त्यांचं ते उग्र स्वरूप पाहून राजा घाबरला. क्षणभर काय होत आहे, हेच त्याला समजेना. दुर्वास महालात आले. रागारागानेच ते म्हणाले, –

" राजा . . ."

अंबरीषर भानाव आला. सारी शक्ती एकवटून तो म्हणाला, " यावं यावं, मुनिवर. मी आपलीच वाट पाहत होतो."

" वा . . . म्हणे, आपलीच वाट पाहत होतो. अतिथीला बोलावलंस आणि मी यायच्या आधी पारणं सोडलंस, मला काय समजलास ? हीच का माझी किंमत ?"

दुर्वासांचा अहंकार दुखावला गेला. ' मी 'ची सत्ता बुद्धीवर सुरू झाली. मनाचा समतोल ढळला.

**मनाचा समतोल ढळविणारा; आणि मानसिक शांतता बिघडविणारा एक भयंकर विकार, हाच क्रोध !**

दुर्वास रागानं लाल झाले. काय बोलावं ते राजाला सुचेना. कसे तरी त्याच्या मुखातून शब्द उमटले,

" मुनिवर, शांत व्हा. मी आपल्या आधी भोजन केलं नाही. फक्त तीर्थ घेऊन ... "

" बस् ... माझ्या आधी उपवास सोडलास ना ? हीच का तुझी रीत ? हा माझा अपमान आहे. "

" आपला अपमान करावा म्हणून मी हे केलं नाही. आपण शांत होऊन विचार करावा आणि ... "

राजाची विनंती ऐकायच्या मनःस्थितीत दुर्वास नव्हते.

**क्रोधानं ग्रासलेल्या अंतःकरणात**
**पेटलेली असते आग ! हालाहला**
**सारखी ! विचारांना जाळणारी**
**अन् शांततेचं स्मशान करणारी ! !**

संतप्त दुर्वास कडाडले.–

" राजा, या दुर्वासाला विचार करायला वेळ नाही. माझी वाट न पाहता तू पारणं केलसं हे अत्यंत अनुचित केलेस. मुक्तीच्या आशेने तू हे करतोस नाही का ? पण लक्षात ठेव – माझ्या अपमानानं तुला मुक्ती तर मिळणार नाहीच पण या भूतलावर पुन्हा दहा जन्म घ्यावे लागतील. "

दुर्वास क्रोधाने थरथरत उभे होते. त्यांची शापवाणी ऐकून अंबरिषाला फार वाईट वाटले. 'व्रतभंग होऊ नये म्हणून केलेलं कृत्य शापाला कारण व्हावं ना ? ' या विचारानं तो सद्गदित

झाला. त्याचा कंठ दाटून आला. डोळ्यातून अश्रू झरू लागले. त्याने अंत:करणापासून भगवंताला साद घातली.

" हे करुणाकरा, दयाघना, तुझ्या व्रताची सांगता भक्तीभावनेने करीत असताना मला शाप मिळावा ना ! मला शापाचं वाईट वाटत नाही ; पण, व्रतपालनाची परिणती ही अशी व्हावी, यानं मन विषण्ण बनलं आहे. हे हृषिकेशा, सांग. माझी काय चूक आहे ? तू पतीत पावन आहेस. दीनोद्धारक आहेस. सांग, यात माझा अपराध कोणता ? "

**भक्तीच्या आर्ततेनं, जीवीच्या जिव्हाळ्यानं आणि हृदयाच्या ओलाव्यानं मारलेली हाक परमेश्वराला पोहचते. देव भावाचा भुकेला असतो. तो भक्तासाठी धावून येतो.**

अंबरिषाचा धावा ऐकून प्रत्यक्ष विष्णू प्रगट झाले. शंख, चक्र, गदाधारी असं विष्णूचं स्वरूप पाहून राजाला आनंद झाला. राजाने लगेच साष्टांग नमस्कार केला. आपला वरद हस्त राजाच्या मस्तकावर ठेवून विष्णू म्हणाले,

" राजा, अनन्य भक्तीभावानं तू माझं व्रत केल्यानं मी तुझ्या भक्तीप्रेमानं बद्ध झालो आहे. तुझं संकट निवारणं माझं कर्तव्य आहे. काही काळजी करू नकोस, तुझ्यासाठी या पृथ्वीवर मी दहा वेळा जन्म घेईन. "

भगवंताचे हे अमृत मधुर बोल ऐकून राजाला गहिवरले. त्याने लगेच मोठ्या भक्तिभावाने भगवंताचे पाय धरले.

दुर्वास हा सारा प्रकार पहात होते. अंबरिषासाठी भगवान विष्णू आलेले पाहून प्रथम त्यांना आश्चर्य वाटलं; आणि आपला शाप विष्णू स्वत: भोगणार आहेत हे ऐकून त्यांचा राग अनावर झाला. ' मी ज्याला शिक्षा दिली ती शिक्षा दुसरा कसा घेणार ? अंबरिषाला तो मोकळा सोडणार ? ' या विचारानं ते अस्वस्थ झाले.

**विकार आंधळे असतात. क्रोधानं अंधळा झालेला माणूस, ज्यानं आपल्याला दुःख दिलं, त्याच्याचकडे पहातो. थोडं थांबून; मागे वळून, आत्मपरीक्षण करण्याचं भान त्याला रहात नाही.**

" माझा शाप फोल होणार " हे दु:ख त्यांना सलू लागलं. मनातला 'मी' फणा काढून उभा राहिला, डंख मारण्यासाठी ! कारण त्यांचा अहंकार दुखवला गेला ना ?

**घनीभूत अहंकार म्हणजेच क्रोध !**

दुर्वास रागावले. पुन्हा रागावले. कशासाठी तर अंबरिषाला जगातून नाहीसा करण्यासाठी ! त्यांचा क्रोध अनावर झाला.

त्यांनी आपल्या जटेतला एक केस तोडला. मंतरला आणि अंबरिषावर टाकला. त्याला मारण्यासाठी.

जवळ उभे असणारे विष्णू हे सारं पहात होते. भक्त-वत्सल भगवंतांनी हे जाणलं. त्यांनी आपलं चक्र त्या केसावर सोडलं. दोघं एकमेकावर आपटताच प्रचंड शक्ती निर्माण झाली. केस जळून गेला. ते पाहून दुर्वास घाबरले. आता चक्र त्यांच्या दिशेने

पुढे सरकले. चक्राच्या कचाट्यातून सुटण्यासाठी दुर्वास पळत सुटले.

चक्र मागे लागले. 'आता आपल्याला यातून कोण मुक्त करू शकेल?' विचार करता-करता दुर्वासांना ब्रह्मदेवाची आठवण झाली. तो सृष्टीनिर्माता असल्याने तोच यातून मुक्त करू शकेल असे वाटल्यावरून दुर्वास ब्रह्मदेवाकडे गेले. घाई घाईने धावत-पळत आलेल्या दुर्वासाला पाहताच ब्रह्मदेव म्हणाले,

"दुर्वासा, आज असा घाईने आलास? आणि तू इतका घाबरलास कशाने?"

"देवा, आपण सर्वज्ञ आहात आणि माझ्याच तोंडून हे सारं कशाला वदवता? हे विष्णूचं चक्र मागे लागले आहे..."

हं आलं लक्षात, दुर्वासा, इतकी वर्षे तपश्चर्या केलीस; पण अजून इंद्रिये आणि विकार ताब्यात ठेवता येत नाहीत? अरे–

**'मी' कोणीतरी आहे, याला धक्का बसला की, क्रोध उत्पन्न होतो. या क्रोधानं अविवेक. अविवेकानं कर्तव्याविषयी स्मृतिभ्रंश निर्माण होतो. भ्रष्ट स्मृती निश्चयात्मक बुद्धी नष्ट करते, आणि त्यातून सर्वनाश उद्भवतो.**

हे सारं संकट तुझ्या क्रोधानं निर्माण झालं आहे."

"देवाधिदेवा, मला हे सारं मान्य आहे; पण आता यातून माझी सुटका..."

"दुर्वासा, हे विष्णुचक्र आहे. त्याची शक्ती विलक्षण आहे. मी भगवान विष्णूच्या आज्ञेनं वागत असतो. त्यांच्या शक्तीचं निवारण मी कसं करू शकणार?"

" तरीही काहीतरी उपाय . . . आपण भगवान विष्णूंना सांगितलं तर . . . "

" ते कठीण आहे. त्या बाबतीत मी असमर्थ आहे. तू शंकराकडे जाऊन बघ. "

ब्रह्मदेवाने निराशा केलेले दुर्वासमुनी पुन्हा धावू लागले. चक्राने अजून पिच्छा सोडला नव्हता. शंकरांना शरण जाण्या-वाचून दुसरा मार्ग दिसत नव्हता. भगवान शंकर भक्तावर लवकर प्रसन्न होतात. आपल्यालाही ते पाठीशी घालतील असे वाटल्यावरून दुर्वास कैलासावर पोहोचले.

शंकर ध्यानस्थ बसले होते. दुर्वास धावतच तेथे गेले. त्यांनी शंकराची प्रार्थना केली. थोड्याच वेळात त्यांनी डोळे उघडले. दुर्वासांना तशा स्थितीतही जरा हलके वाटले. आपली सगळी कहाणी शंकरांना सांगून ते म्हणाले, –

" देवा, महादेवा, ब्रह्मदेवानं आपल्याकडे जायला सांगितलं म्हणून मोठ्या आशेनं मी येथे आलो आहे. आपण पतीत पावन आहात. दीनांचा उद्धार करणारे आहात. देवा, मी तुम्हांला अनन्यभावाने शरण आलो आहे. माझ्यामागे लागलेल्या या चक्राचं आपण निवारण करावं. "

शंकरांनी जाणलं. " याचा अहंकार कमी झाला आहे. तरी भगवान विष्णूंची महती याला कळलेली दिसत नाही. तेथेच विष्णूंना शरण जाण्याऐवजी हा सगळीकडे पळत सुटला आहे. याला परत तेथेच पाठवले पाहिजे आणि विष्णूंच्याकडूनच भगवत भक्ताची थोरवी ऐकविली पाहिजे. म्हणजे याला कळेल,

**" स्वतःचा उद्धार होण्यासाठी ज्ञानाला भक्तीचा ओलावाही आवश्यक असतो. "**

शंकर त्याला म्हणाले –

" दुर्वासा, तुझी व्यथा मी जाणतो; पण भगवंताची ही शक्ती परत घेण्याचं सामर्थ्य फक्त त्यांच्याचकडे आहे.

तू त्यांनाच शरण जा. ते भक्तवत्सल आहेत. तेच यातून मार्ग काढतील. "

भगवान शंकरानीही निराशा केलेली पाहून दुर्वास हताश झाले; पण पाठीमागे लागलेल्या चक्राचे निवारण वेळीच करणे आवश्यक होते.

**जीवन आशेच्या शृंखलांनी बांधलेला माणूस वेड्यासारखा धावत असतो. एका ठिकाणी पदरी निराशा आली तर तेथे न थांबता तो दुसरा आसरा शोधत असतो.**

दुर्वास धावत-धावत, दीनवाण्या मुद्रेने विष्णूंकडे आले. त्यांना साष्टांग नमस्कार करून म्हणाले –

" हे भगवंता, माझी चूक झाली. मला क्षमा करा. ह्या चक्राचं निवारण करा. माझा ताप नाहीसा करा."

हे ऐकताच विष्णूंनी मंद स्मित केलं. ते म्हणाले, –

" दुर्वासा, माझं हे चक्र माझ्या आज्ञेत कोठे आहे ? "

" म्हणजे ... देवा, माझी थट्टा करता होय ? नका ... मेलेल्याला अधिक मारू नका. तुमची लीला अगाध आहे. मला

सारं पटलं आहे. माझा असा अंत पाहू नका. देवा, तुम्ही भक्त-वत्सल आहात..."

"होय. मी भक्तवत्सल आहे. म्हणून तर कठीण झालं आहे."

"आपलं बोलणं माझ्या ध्यानी नाही आलं."

"दुर्वासा,

**जे भक्त अनासक्त, शुद्धाचरणी, कर्तव्यतत्पर असतात. ज्यांना काम, क्रोधादि विकार स्पर्श करीत नाहीत, ते भक्त मला आवडतात."**

त्या भक्तांनी दिलेल्या प्रेमानं मी त्यांचा ऋणी होतो. त्यांचा दास होतो, त्यांची सत्ता माझ्यावर चालते. अंबरीष हा माझा अनन्य भक्त आहे, त्याचं रक्षण करणं हे माझं काम. ते मी केलं. आता, मी त्याचा ऋणी असल्यानं हे चक्र मी कसं आवरू ? तू अंबरिषाकडे जा. त्याची क्षमा माग. तो तुला निश्चित क्षमा करील. दुर्वासा, एक लक्षात ठेव...

**"देवाला देवपण देणारे त्याचे भक्त, देवापेक्षाही श्रेष्ठ असतात."**

सारखं धाऊन-धाऊन दुर्वासांच्या जटा अस्ताव्यस्त झाल्या होत्या. श्रमानं आणि भीतीनं चेहरा घामेजून गेला होता. जवळ-जवळ वर्षभराच्या भ्रमंतीनं अंगात त्राण राहिलं नव्हतं. गात्रं थकली होती. तोंड कोरडं पडलं होतं. कसेतरी पाय खरडत-खरडत दुर्वास राजा अंबरिषाकडे परत आले आणि त्याच्या पायावर त्यांनी आपले अंग झोकून दिले.

अंबरिषही अतिथीची वाट पहात होता. भोजनाला बोलावून विन्मुख गेलेल्या अतिथीमुळे राजानेही भोजन केले नव्हते. दुर्वास अचानक अशा स्थितीत आलेले पाहताच राजाला आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. त्याने त्यांना उठविले. तो म्हणाला.

" मुनीवर्य, हे काय, आपण अतिथी आहात असं करणं योग्य नाही."

" राजा, चुकलो मी. मला क्षमा कर."

" असं म्हणू नये. हे मुनिश्रेष्ठा, आपण ज्ञानी आहात. थोर आहात. क्रोधाला आवर न घातल्यानं आपण आपल्या चित्तवृत्ती शांत ठेवू शकला नाही. या विकारानं आपल्याला आंधळं बनवलं. नाहीतर आपल्या हातून असं कधीच घडलं नसतं."

राजाची शांत, निरागस, अनासक्त वृत्ती पाहून दुर्वासांचे मन गलबलून गेले. डोळ्यातून अश्रू ओघळू लागले; आणि अहंकारही गळून गेला. विवेक जागृत झाला. भारावलेल्या अंतःकरणानं आणि ओलावलेल्या शब्दांनी दुर्वास म्हणाले,

" राजा, तुझं म्हणणं खरं आहे. अहंकार शून्यतेत विकारांना जिंकण्याचं सामर्थ्य असतं. विकारांना आवर घातल्यानेच चित्तवृत्ती शांत होते. शांत चित्तवृत्तीच मनाला आनंद देते. दुःखाचा परिहार करू शकते.


राजा, क्रोध हा विकार किती भयंकर आहे, हे तू मला दाखवून दिलंस."

" महाराज, तो माझा अधिकार नाही. ही सारी भगवंताची इच्छा !"

" राजा, हे चक्र अजून माझी पाठ सोडत नाही. त्यातून माझी मुक्तता करण्याचं सामर्थ्य तुझ्यातच आहे."

अंबरिषानं चक्राची मनोभावे प्रार्थना केली. चक्र नाहीसं झालं.

एक वर्षानं एकादशीचं पारणं सुटत होतं. दुर्वास आणि अंबरीष दोघंही आनंदात होते. भोजन झालं. राजानं त्यांची योग्य संभावना केली. त्यांना नमस्कार केला. अंतःकरणपूर्वक प्रेमानं आशीर्वाद देऊन तृप्त मनानं दुर्वास अंबरिषाच्या महाला बाहेर पडले.



१६४३६

IRBK-0116436

IRBK-0116436

